■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ७ ● मंगळवार, दि. ८ ते १५ जुलै २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.



# राज्यात रिक्त पदांसाठी लवकरच 'मेगा भरती'

**मुंबई, दि. ७ : राज्य शासनाने सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम (रिक्रुटमेंट रूल) सुधारित करणे, अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करणे, आदी उद्दिष्टे दिली आहेत. या उद्दिष्ट पूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर या रिक्त पदांसाठी राज्य शासन 'मेगा भरती' करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत सदस्य भीमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांनीही उपप्रश्न उपस्थिती केले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील काळात शासनाने ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली.

शासन पदभरतीबाबत कुठेही मागे पुढे पाहणार नाही. राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६,८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले कार्यरत आहे. मात्र त्यांना २० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा पदांबाबत शासनाने मानवतापूर्ण दृष्टीने विचार करीत ही पदे अधिसंख्य केली. या पदांवर कार्यरत असलेल्यांना बढती मिळणार नाही. पण शासन त्यांना पदावरून कमीही करणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ही पदे व्यपगत होतील.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानसभा लक्षवेधी सुचनेला उत्तर

अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदूनामावलीनुसार एकही राखीव पद रिक्त ठेवण्यात येणार नाही.

अधिसंख्य असलेली ६ हजार ८६० पदे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भरती करण्याकरिता रिक्त झालेली आहे. त्यापैकी १३४३ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर भरती केलेली आहे. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ब्लॉक चेन पद्धतीवर अभिलेख आणण्याबाबत शासन प्रयत्न करीत आहे.

त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी करताना कागदपत्रे तपासणे सोयीचे होईल. तसेच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना सक्षम करण्यात येत आहे. अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत सचिवांचा गट तयार करण्यात येईल. या गटाच्या माध्यमातून अभ्यास करून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने सफाई कामगारांची पदे वारसा हक्काने भरण्याबाबत असलेली स्थगिती उठवलेली आहे. लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार ही पदे वारसा हक्काने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या पदांसाठीही भरतीही करण्यात येणार आहे.

# जिल्ह्याच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी निर्धारबद्ध पावले उचलावीत - जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

वाशिम, दि. ७ जुलै (जिमाका) - जिल्ह्यातील प्रशासनात पारदर्शकता निर्माण करणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच अंमली पदार्थविरोधी उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता व संनियंत्रण समिती आणि नार्को समितीच्या संयुक्त बैठका आज दि.७ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात पार पडल्या.

या बैठकीस पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी, समाज कल्याण विभाग, आरोग्य विभाग, महसूल विभाग, शिक्षणाधिकारी आदी विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील विविध विभागांतील प्रलंबित तक्रारी आणि नागरिकांच्या अडचणी यावर सविस्तर चर्चा झाली.

## दक्षता व नार्को समितीची बैठक संपन्न





यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी संबंधित विभाग प्रमुखांना वेळेत व कार्यक्षमतेने काम पार पाडण्याचे निर्देश दिले.

नार्को समितीच्या बैठकीत जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुरू असलेल्या उपाययोजना, पोलिस विभागाची कारवाई, तसेच युवकांमध्ये जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. शालेय व महाविद्यालयीन पातळीवर व्यसनमुक्तीसंदर्भात विशेष मोहिमा राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. शासनाच्या विविध योजना, सुविधा आणि जनतेच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण होण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सजग राहून काम करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी दक्षता व नैतिकतेचा अवलंब महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

महिला व बालविकास विभागाचा आढावा घेताना जिल्ह्यातील शाळकरी मुलांमध्ये व्यसनांचे घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी १४४६० (महिला हेल्पलाईन) व १०९८ (बालहक्क संरक्षणासाठीची चाईल्ड हेल्पलाईन) या क्रमांकांचा व्यापक प्रचार करण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांनी या क्रमांकांचा वापर करून त्वरित तक्रार नोंदवावी, असे आवाहनही बैठकीतून करण्यात आले.

शासनाच्या विविध योजना, सुविधा आणि जनतेच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण होण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सजग राहून काम करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी दक्षता व नैतिकतेचा अवलंब महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

# सहकारी संस्थांची एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

वाशिम (जिमाका) - आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या पार्श्वभूमीवर सहकार मंत्रालय भारत सरकार यांच्या निर्देशानुसार साजऱ्या होणाऱ्या सहकार सप्ताह (१ ते ६ जुलै २०२५) अंतर्गत ५ जुलै २०२५ रोजी (सहकार मंत्रालय भारत सरकार वर्धापन दिन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे जिल्हा पातळीवरील क्षेत्रीय कार्यालय असलेल्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम या कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील अधिनस्त असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी, कर्मचारी, सर्व तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे गटसचिव यांचेकरीता प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था संगणकीकरण, सीएससी बाबत राजेंद्र पडघान (जिल्हा व्यवस्थापक, सीएससी इंडिया लि.), ई-ऑडिट विनायक राऊत (डीसीओ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा वाशिम) तसेच इंदुजा लि. कंपनीमार्फत मदर डेअरी च्या वतीने दूध संकलन व निविष्ठा केंद्र चालविणेबाबत गणेश ढाकणे (इंडिया डेअरी, यवतमाळ) यांचेकडून मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.



तसेच, उपस्थित पदनिर्देशित अधिकारी यांचेसोबत प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था च्या प्रभावी अंमलबजावणी करीता चर्चा करून त्यांचे अभिप्राय घेण्यात आले व त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करुन आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. या कार्यशाळेला अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शंकर कोकडवार (जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड वाशिम) हे मान्यवर उपस्थित होते. आर. आर. सावंत (सहाय्यक निबंधक, प्रशासन, अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम) यांचेसह वाशिम जिल्ह्यातील सर्व तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्थांचे अधिकारी, कर्मचारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सर्व कर्मचारी व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे गटसचिव उपस्थित होते.

## संपादकीय

# सकल तीर्थाचे माहेर

वारकरी पंथात एकादशी व्रत, वारी, हरिपाठ, नामस्मरण, भजन, कीर्तन इत्यादींना जसे महत्त्व आहे तसेच चंद्रभागेला आणि चंद्रभागेतील पवित्र स्नानालाही तितकेच महत्त्व आहे. पंढरीला जाऊन, चंद्रभागा पाहून, तिचे दर्शन घेऊनच सर्व वारकरी माघारी परततात. किबहुना आधी चंद्रभागेचे स्नान आणि नंतर विठुरायाचे दर्शन असा हा क्रम असतो. संत नामदेवांनी म्हटले आहे 'आषाढी कार्तिकी भक्तगण येती हो साधुजन येती! चंद्रभागेमध्ये स्नानजे करती' म्हणजेच चंद्रभागेच्या स्नानात मुक्तीचा आनंद आहे. त्यामुळेच चंद्रभागेच्या पवित्र स्नानाला वारकरी पंथामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे हे लक्षात येते. 'सकल तीर्थाचे माहेर' म्हणून चंद्रभागेचा अनेक संतांनी उल्लेख केला. ते संतांच्या अगाध विठ्ठलभक्तीचेच प्रतीक आहे. मराठी सामान्य जनांच्या मनात इतर तीर्थक्षेत्री जाता येत नाही याबद्दल कोणतीही खंत अथवा न्यूनगंड राहू नये म्हणूनच चंद्रभागेस मराठी संतांनी भूलोकीचे वैकुंठ हा दर्जा दिला. मराठी संताच्या अभंगातून चंद्रभागा तुडुंब भरून वाहते. चंद्रभागेच्या तीरावरच भावभक्तीचा व विठ्ठलभक्तीचा मळा फुलला. 'माझी बहीण चंद्रभागा करितसे पाप भंगा' असे म्हणून संत एकनाथांनी तिला सजीव मानवी देहरुपात पाहिले. तिला बहिणीचा दर्जा देऊन समग्र संत मेळ्यामध्ये चंद्रभागेलाही सामील करून घेतले. कधी माझी माय तर कधी बहीण अशा स्त्री रुपात तिला पाहिले गेले. माझी माय चंद्रभागा! आज चांदण्यात न्हाली! असे म्हणूत संत जनाबाईने तर तिला चांदण्यात न्हाऊ घातले. हा अभंग म्हणजे उत्तम भावकाव्याचा नमुनाच. त्या दृष्टीने चंद्रभागा केवळ मोक्षदायिनी राहिली नाही तर ती इथे भावदायिनी बनली. चंद्रभागेच्या साक्षीनेच मराठी संत आपले जीवन जगले. आपले सुखदु:ख चंद्रभागेच्या पाण्यातच त्यांनी वाहिले आणि आपल्या व्यथा वंचनाही तिच्यातच विसर्जित केल्या. संत नामदेवाचे वास्तव्यच चंद्रभागेच्या तीरावर असल्याने त्यांच्या अनेक अभंगातून या तीर्थाबद्दलचा आभिमान ओतप्रोत भरलेला दिसतो. संत नामदेवाच्या अंतरंगातील उत्कट विठ्ठलभक्ती आणि पंढरी प्रेमाच्या असीम भावनेमुळे ते स्वाभाविकच ठरते. पंढरीचा प्रेमा म्हणूनच नामदेवांची ओळख असल्याने त्यांनी आपल्या पंढरी माहात्म्याच्या अभंगामध्ये चंद्रभागेची थोरवी गायली आहे. संत नामदेव म्हणतात, 'सर्व सुख राशी भिवरेच्या तीरी। आमुची पंढरी कामधेनु।' या पुढे जाऊन ते 'सकळा शिरोमणी चंद्रभागा' असा उल्लेख करून सर्व तीर्थाहून अधिक महत्त्व चंद्रभागेस देतात. एवढेच नाही तर 'प्रतिदिनी माध्यान्ही। सकळ तीर्थे तिये स्थानी। भिवरे सुस्नात होऊनी। विठ्ठल चरणी लागती।' असे म्हणून ते चंद्रभागेचे महात्म्य अभिव्यक्त करतात, हे लक्षात येते. 'त्रिभुवनाची तीर्थे झाली ती मलीन। व्हावया पावन आली इथे।' फक्त भूतलावरच नव्हे तर तिन्ही लोकांमध्ये चंद्रभागा किती श्रेष्ठ आहे असा दाखला नामदेव या अभंगातून देतात. संत नामदेवांनी जे महत्त्व चंद्रभागेला दिले त्यामध्ये त्यांचे द्रष्टेपण आणि श्रेष्ठ प्रवक्त्याची अनन्यसाधारण अशी गुणसंपन्नता दिसून येते. वारकरी पंथाचा आणि विठ्ठलभक्तीचा प्रसार, प्रचार करण्यासाठी संत नामदेवांनी किती प्रयत्न केले याचे हे मूर्तिमंत प्रतीक आहे. पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान! आणिक दर्शन, विठोबाचे! हेच तमाम वारकर्यांच्या जीवनाचे श्रेय असल्याने मराठी संताची चंद्रभागा ही मराठी लोकमानसामध्ये भक्तिभावाने प्रवाहित झालेली दिसून येते. सामान्य मराठी जनाला इतरत्र कुठेही तीर्थाटन करता आले नाही, तरी त्यांच्या मनात कसलेही मानसिक, पारमार्थिक न्यूनगंड निर्माण होऊ नये याची पुरेपूर काळजी मराठी संतानी घेतली आणि त्यासाठी चंद्रभागेची थोरवी त्यांनी मुक्त कंठाने गायली. असे आपण सार्थपणे म्हणू शकतो. या चंद्रभागेच्या तीरीच गोमटी पंढरी वसलेली आहे याचा सार्थ अभिमान नामदेवांना होता. ऐसे तीर्थ कोणी दाखवा गोमटे! जेथे प्रत्यक्ष भेटे परब्रह्म! कोठे ऐसे क्षेत्र आहे त्रिभुवनी! सकळा शिरोमणी चंद्रभागा! या तीर्थासारखे अन्य तीर्थ नाहीच असे नामदेवांनी ठामपणे प्रतिपादन केले. सर्वांग व्यापिनी भीमा सुंदरी म्हणत त्यांनी चंद्रभागेच्या विशालतेचा, सौंदर्याचा वेध घेतला. चंद्रभागेसी करिता स्नान! तुझे दोष पळती रानोरान! असे म्हणत या नदीच्या पावित्र्याची महिमा त्यांनी गायली.

# बेलखेडा ते हिवरापेन रस्ता झाला जीवघेणा; सार्वजनिक बांधकाम उपविभागाला जाग कधी येणार?



**रिसोड** - तालुक्यातील बेलखेडा ते हिवरापेन जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर अनेक काटेरी व इतर झाडे आली असून या रस्त्यावरून विद्यार्थ्यांच्या बसेस व ऑटो रिक्षा ये- जा करतात. हा रस्ता बेलखेडा गावाजवळ असलेल्या पुलालगत ज्ञानबा घोडे यांच्या शेतालगत असलेला डांबरी रस्ता फार खचून गेला असून वाहन चालवतांना ते वाहन कधीही पलटी होऊ शकते. विद्यार्थ्यांचे जीव जाऊ शकतात. हा रस्ता संपूर्णपणे एका बाजूने दबलेला असून झुकला आहे.

त्यामुळे या शाळेच्या बसखाली एखादा दगड आल्यास बस पलटी होऊ शकते. करिता हा रस्ता तात्काळ दुरुस्ती करावा. या जागेवर उत्तर दिशेला मोठी नाली असून गाडी पलटी झाल्यास शंभर टक्के चारही चाके आकाशाकडे डोळे लावून पाहू शकतात. तसेच हिवरापेन ते चिंचाबापेन दरम्यान इतकी काटेरी झाडे वाढली आहेत की एसटी बसच्या दोन्ही खिडक्या मधून काटेरी झुडपाचे फटके खिडक्याजवळ असणाऱ्या प्रवाशांच्या डोळ्याला व चेहऱ्याला बसू शकतात व इजा होऊ शकते. त्यामुळे या रस्त्यावरील असलेल्या काटेरी व इतर झाडाची साफसफाई करून बेलखेडा गावाजवळ दबलेल्या रस्त्यावर मुरूम टाकून तो रस्ता चांगला होईल असे करावे. अशी हिवरापेन गावातील गोविंदराव सरनाईक, राजकुमार सरनाईक, पंडितराव सरनाईक, मंचकराव सरनाईक, जगदीश राव सरनाईक, मनोज सरनाईक, स्वप्निल सरनाईक, वैभव सरनाईक, संज्याबराव सरनाईक, डॉ. कैलास सरनाईक, नारायणराव सरनाईक, पंकज देशमुख, निलेश सरनाईक, गजाननराव देशमुख, यांच्यासह विद्यार्थ्यांच्या पालकांची व ज्येष्ठ नागरिकांची मागणी आहे. जर याबाबत सार्वजनिक बांधकाम उपविभाग रिसोड यांनी दखल घेतली नाही तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. असे या नागरिकांनी बोलतांना सांगितले.

# लेफ्टनंट गाडे यांचा मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या वतीने सत्कार



**रिसोडः** तालुक्यातील शहरा पासून जवळच असलेल्या पवारवाडी येथील दिलीप गाडे यांचे सुपुत्र तथा वाशिम सारख्या अक्षांकित जिल्ह्याचे भूषण, अभिषेक दिलीप गाडे यांची भारतीय सैन्यामध्ये लेफ्टनंट पदी निवड झाल्याबद्दल मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड या पुरोगामी संघटनेच्या वतीने खडसे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड ह्या पुरोगामी चळवळी आपल्या प्रगल्भवादी विचारांना जपत विधायक उपक्रम राबवत असतात. बहुजन समाजातील उच्च गुणवत्ता धारण करणाऱ्यांचा ते नेहमीच सन्मान करत असतात. याचाच एक भाग म्हणून देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्म यांनी शपथ दिलेल्या व राजपत्र प्रदान केलेल्या पवारवाडी येथील शेतकरी कुटुंबातील अभिषेक दिलीप गाडे यांची लेफ्टनंट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ, शाल व मराठा सेवा संघाच्या विचारधारेचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बालाजी सहकारी सूतगिरणीचे अध्यक्ष तथा मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक माननीय बाबारावजी पाटील खडसे, जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवाजी कव्हर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष विनोद पाटील खडसे, संभाजी ब्रिगेड रिसोड तालुका अध्यक्ष रमेश पाटील सदार, पत्रकार रुपेश बाजड, एडवोकेट संतोष जाधव, माजी पंचायत समिती सदस्य रवींद्र मोरे, प्राध्यापक रामराव वानखेडे सर, सुधीर सरकटे सर, साहेबराव सरकटे सर, पुरुषोत्तम बिलारी सर, दिलीप गाडे सर, परशराम गव्हाणे, बिलारी सर, नितीन तोंडे, मुख्याध्यापक सूर्यवंशी सर इत्यादी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. ता.प्र.



# विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना अनुदान द्यावे

## शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांची विधान परिषदेत लक्षवेधी

वाशिम :राज्यातील विनाअनुदानित तसेच अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तात्काळ वाढीव टप्पा देण्यात यावा अशी आग्रही मागणी शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक यांनी विधानपरीषदेत केली असून या संदर्भात लक्षवेधी प्रश्न सादर करुन तत्काळ अनुदान देण्याची मागणी केली.

महाराष्ट्रातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे अनुदान वाढीव टप्पा जाहीर करण्यात आला. मात्र आठ ते दहा महिने होऊन सुद्धा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष वाढीव अनुदान मिळाले नाही. महाराष्ट्रातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून आझाद मैदान वर हुंकार आंदोलन करत आहेत व दि. ८ व ९ रोजी महाराष्ट्रातील सर्व शाळा बंद ठेवण्यात येणार आहेत.

अनुदान वाढीव टप्पा मिळण्यासाठी अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरण राव सरनाईक यांचा सतत पाठपुरावा सुरू आहे. २ जुलै रोजी किरणराव सरनाईक यांनी विधान परिषदेत लक्षवेधी प्रश्न सादर करून तात्काळ अनुदान समस्या सोडविण्याची मागणी केली. विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तात्काळ वाढीव टप्पा मिळेल असे आश्वासन सरकारतर्फे देण्यात आले. परंतु हे आश्वासन नेहमीचे झाले आहे यावर किरणराव सरनाईक तसेच इतर प्रतिनिधी यांचे समाधान झाले नाही.

किरणराव सरनाईक यांच्या प्रयत्नामुळे अनुदान टप्पा वाढी संदर्भात शासनाला धारेवर धरले गेले आहे. त्यामुळे लवकरच हा निर्णय प्रत्यक्षात उतरेल अशी आशा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आहे. शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुद्धा लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता. मध्यंतरी शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन दिले तसेच आता पंधरा दिवसापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुद्धा निवेदन सादर करण्यात आले होते. त्यामुळे शिक्षकांप्रती संवेदनशील असलेले किरण राव सरनाईक यांच्या शिक्षकांच्या समस्यांबद्दल सततच्या पाठपुराव्याची प्रचिती सर्वांना आली आहे. ता.प्र.

### १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी

या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री पंकज भोयर यांनी औपचारिकपणे प्रतिसाद दिला. त्यानंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व ज्यांच्या कार्यकाळात अनुदान टप्पा वाढीचा शासन निर्णय जाहीर झाला असे एकनाथ शिंदे यांनी उत्तर देत शासन या संदर्भात सकारात्मक असून लवकरात लवकर यामध्ये योग्य तो तोडगा काढला जाईल व विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तात्काळ वाढीव टप्पा मिळेल असे आश्वासन दिले.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

यांत्रिकी मंडळ, नागपूर


# कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड अमरावती


**पिन कोड - ४४४६०२ यांचे कार्यालय**

**पत्ता : कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड अमरावती पिन कोड - ४४४६०२**

**ई-मेल :** eegatcdiv1amt@gmail.com **दुरध्वनी क्र. : ०७२१-२६६१४५१**


## निविदा सुचना क्र. १५ /सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड, अमरावती पिन कोड-४४४६०२**, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या **https:// wrd.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. खालील नमुद केलेल्या कामांच्या निविदा बी-१ नमून्यांत सिलबंद निविदा मागविण्यांत येत आहे. कोऱ्या निविदा कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे कार्यालयांत रकाना क्र. ९ मध्ये दर्शविल्यांप्रमाणे कार्यालयीन वेळेत देण्यांत येईल व रकाना क्र. १० मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे कार्यालयांत स्विकारले जातील आणि **शक्य झाल्यांस त्याच दिवशी उघडण्यांत येतील.** कोऱ्या निवीदा संचाचे शुल्क धनाकर्ष मार्फत स्विकारले जाणार आहे. धनाकर्ष कंत्राटदाराचे स्वतःचे बैंक खात्या मार्फत निर्गमित करण्यांत आलेले असावेत. धनाकर्ष कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे नावे असला पाहीजे याची कृपया नोंद घ्यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | अंदाजपत्रकीय (GST रक्कम व Insurance वगळुन) | इसारा रक्कम | प्रारंभिक सुरक्षा ठेव रक्कम | कामाची मुदत | निविदा शुल्क (GST सहीत) | निविदा विक्रीचा कालावधी | निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | कंत्राटदाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | **अरक चिंचाळा प्रकल्पावरील शिर्ष. विमोचकाकरीता ०.९ X ०.९ मी. - १ संच आपातकालीन व्दाराचे व्दार कळी, निविष्ठ भाग, उच्चालक ५ मेटन. क्षमता व इतर सलग्न घटक भागाचे निर्मिती व उभारणी कामे** | वाशिम | **रु. ८,४५,८१७/-** | ८५००/- | ८५००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०७/०७/२०२५ पासून दिनांक १४/०७/२०२५ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १४/०७/२०२५ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १५/०७/२०२५ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |

**अटी व शर्ती :-**

१) कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे कार्यालयात सूचना फलक, नियमानुसार वृत्तपत्रे व www.mahayantriki.gov.in या website सविस्तर सूचना पाहावयास मिळेल.

२) कोणतेही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्यांचा हक्क हे कार्यालय राखून ठेवत आहे.

३) वरील अंदाजपत्रकीय रक्कम GST व Insurance वगळून सर्व करासहीत एकत्रित असुन शासकीय नियमाप्रमाणे कर भरणाची जबाबदारी निविदाकाराची असून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास देयकातून कपात करण्यांत येईल व नियमानुसार भूगतान करण्यांत येईल. GST ची रक्कम कंत्राटदारास वेगळे देय राहील.

४) खालील परिच्छेद क्र. ५ मधील नमूद केलेल्या निविदा कागदपत्रांपैकी संपुर्ण कागदपत्रे संभाव्य कंत्राटदाराने लिफाफा क्र. १ मध्ये सादर करणे निकडीचे आहे. अपुर्ण सादर केलेल्या कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी या विभागामार्फत कसल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. निविदा कागदपत्रे तपासणीअंती निविदा कागदपत्रे अपुर्ण आढळल्यास संबंधीत कंत्राटदारास तांत्रिक मुल्यांकन अहवालामध्ये अपात्र ठरविण्यात येईल व संबंधीतांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. ५) सदर निविदा सुचनेतील कामांकरीता संभाव्य कंत्राटदारांनी कोरे निविदा संचासोबत खालिलप्रमाणे कागदपत्रे निविदा भरतांना सादर करणे आवश्यक राहील.

a) Attested xerox copy of valid GST registration certificate alongwith previous month GSTR 3B return. (b) Income Tax Return for Financial Year 2023-24. (Assessment Year 2024-25) (c) Term Deposit Receipt for 12 Months of any schedled Bank for the amount of earnest money.

(d) PAN Card. (e) Aadhar Card. (f) Contractor should attached an Affidavit on Rs. 500/- stamp paper about the correctness and validity of all paper attached/ submitted in Tender, duly attested by The Govt. authorized agencies i. e. Setu / Notorial, not below the rank Executive Magistrate. (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ वर्ष १०, अंक २९ (३), १४ ऑक्टोंबर २०२४) (g) Declaration of the contractor as per Appendix "E" as mentioned on the Page No. 29 of the Blank Tender Booklet on letter head.

६) सदर निविदा सूचनेतील कामांकरीता कंत्राटदारांची Bid Capacity लागु राहील व त्यास्तव उपरोक्त परिच्छेद अ.क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांव्यतीरिक्त खालिलप्रमाणे कागदपत्रे कंत्राटदाराने निविदा भरतांना सादर करणे आवश्यक राहील:-

(a) List of works in hand and works tendered along with **supporting certificates.** (b) List of plants and Machinery to be deployed at work site **in the form of self attested on letter head.** (c) List of Technical Persons to be deployed at work site **in the form of self attested on letter head.** (d) Attested copy of Scanned from original copy of **Turnover Certificate** of last five years, duly issued by chartered accountant and supported with ITR & Balance sheet with Profit & loss statement for last five years (Since FY 2019-20 to FY 2023-24). Figures in Annual Turnover Certificate should be matched / in accordance with figures in profit & loss statement. UDIN number is mandatory.

जा.क्र. /१३७०/व्दानिवडउविक्र. १/अम./निविदा शाखा/२०२५

कार्यालय :
व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १,
जेल रोड अमरावती
दिनांक - ३०/०६/२०२५

स्वाक्षरीत/-
**(गणेश म. भगत)**
कार्यकारी अभियंता
व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १,
जेल रोड, अमरावती

प्रत : कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे, जलसंपत्ती भवन, कर्वे पुतळयाशेजारी, कोथरुड, पुणे-४११०३८ यांना माहितीस्तव समादराने अग्रेषीत. सदर निविदा सुचना यांत्रिकी संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांस आपणांस विनंती करण्यांत येत आहे.

सहपत्र: निविदा सूचना क्र. १५ सन २०२५-२६ : ०१ प्रतीत.

प्रत: कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, जेल रोड, अमरावती यांचे कार्यालयातील सुचना फलक.

सहपत्र: निविदा सूचना क्र. १५ सन २०२५-२६ : ०१ प्रतीत.

विमाका/अम/जाहि./३०१/२०२५-२०२६

# महाविकास आघाडीची संवाद बैठक उत्साहात



रिसोडः आगामी नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीची रिसोड शहरातील माहेश्वरी भवन येथे आढावा बैठक संवाद बैठक संपन्न झाली.

या बैठकीचे अध्यक्ष म्हणून रिसोड मालेगाव विधानसभेचे आ. अमित झनक हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेना नेते तथा जिल्हा परिषद चे पूर्व सभापती विश्वनाथ सानप, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील,महाविकास आघाडीची संवाद बैठक रिसोड शहरातील माहेश्वरी भवन येथे आढावा बैठक संवाद बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये आगामी रिसोड नगर परिषद च्या निवडणुकीच्या संदर्भाने चर्चा करण्यात आली. रिसोड नगरपरिषद ची निवडणूक ही पूर्ण ताकदीने लढवून काबीज करून रिसोड शहराचा विकास करणे संदर्भाने योग्य त्या उपाययोजना करण्याचे व जोमाने कामाला लागण्याचे निर्देश आमदार अमित झनक यांनी उपस्थित महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिले. यावेळी डॉक्टर रमेश साबू, राजूसेठ तोष्णीवाल, शेख अजीज, घनश्याम मापारी तसवर कादरी, सिकंदर खान, कैलास ठाकरे, मा. नगरसेवक फायाज अहेमद, इरफान कुरेशी, अकबर बागवान, भारत भाऊ शिंदे, शेख मन्नान, पप्पीभाई कदम, संजय इरतकर, रियाज पठाण, राजूभाऊ राऊत, बगडिया, गणेश गांजरे, भगवान गाडे आदी कार्यकर्ते मोठ्या उपस्थिती होते बाळासाहेब देशमुख हे होते. बैठकीमध्ये आगामी रिसोड नगर परिषद च्या निवडणुकीच्या संदर्भाने चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थितांची मनोगतही घेण्यात आले. आमदार अमित झनक यांनी उपस्थित महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिले. राऊत, बगडिया, गणेश गांजरे, भगवान गाडे आदी कार्यकर्ते मोठ्या उपस्थिती होते. ता. प्र.

# लोणी बुद्रुक येथे माऊली मंदिरावर भक्तांची मांदियाळी



**रिसोड,**

रिसोड तालुक्यातील श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथील गांधारी रस्त्यावर असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर येथे आज ता.६ रोजी देवशयनी आषाढी एकादशी निमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन ह.भ.प.मेघश्याम पंसारी यांनी केले होते.

भक्तांनी सकाळ पासूनच दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर लोणी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी देवशयनी आषाढी एकादशी निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भक्ताना साबुदाणा खिचडीचे आयोजन करण्यात आले होते.लोणी बुद्रुक परिसरामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांचे एकच मंदिर असल्याने पंचक्रोशीतील भक्तांनी दर्शनासाठी सकाळ पासूनच मोठी गर्दी केली होती. यावेळी माऊली मंदिराचे विश्वस्त ह.भ.प.मेघश्याम पंसारी यांनी स्वखर्चातून या माऊली मंदिराचे बांधकाम केले असल्याने पंचक्रोशीतील भक्ताना लोणी येथेच प्रतिपंढरपूर प्रमाणे दर्शनाची सोय उपलब्ध झाली आहे.हजारो भाविक भक्तांनी यावेळी दर्शन तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.

# रिसोड शहरात पोलिसांचे पथसंचलन



**रिसोड**

आषाढी एकादशी व मोहर्रम निमित्ताने रिसोड शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता रिसोड पोलीसांचा तगडा बंदोबस्त रिसोड शहरात तैनात करण्यात आला होता.

या निमित्ताने दिनांक ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता रिसोड पोलीस स्टेशन कडून ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वात पथसंचलन करण्यात आले सदर पतसंचलन पोलीस स्टेशन येथून निघत मोमीनपुरा, चांदणी चौक, जुनी सराफा लाइन, अष्टभुजा देवी चौक, आसन गल्ली, पंचशील चौक, अण्णाभाऊ साठे चौक, लोणी फाटा, भाजी मंडी, डॉक्टर आंबेडकर चौक येथून सिव्हिल लाईन मार्गे परत पोलीस स्टेशनमध्ये पथसंचलनाची समापन झाले. या सदर पथ संचालनामध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी, एस आर पी, होमगार्ड्स सामील झाले होते.

# रिसोड-मेहकर रस्त्याची दुरूस्ती; एसटी सेवा ठप्प



रिसोडः रिसोडते मेहकर मार्गावरील रस्त्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. रस्ता सुरळीत असल्याचा दावा संबंधित कंत्राटदारांनी केला तर आता रस्ता सुस्थितीत नसल्यामुळे बससेवा पूर्ववत करू शकत नसल्याचा पवित्रा रिसोड आगार व्यवस्थापनाने घेतला. मागील चार दिवसांपासून एसटी सेवा ठप्प असल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. रिसोड-मेहकर मार्ग हा संभाजीनगर, शिर्डी, जळगाव, खान्देश आणि समृद्धी महामार्गाकडे जाणारा मुख्य मार्ग आहे. त्यामुळे या मार्गावर नेहमीच वर्दळ असते. उन्हाळ्यात खोदलेला रस्ता पावसाळ्यात अधिकच खराब झाला आहे. वेळेवर डांबरीकरण पूर्ण झाले असते, तर आज या मार्गावरून वाहतूक सुरळीत सुरू राहिली असती, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत. रिसोड आगार व्यवस्थापकांनी या मार्गाची सद्यस्थिती पाहता एसटी सेवा सुरू करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे मागील चार-पाच दिवसांपासून या मार्गावरील सर्व एसटी फेऱ्या बंद आहेत. श. प्र.

**विद्यार्थ्यांसह प्रवाशांचे हाल**

सध्या एसटी सेवा बंद आहे. शाळा महाविद्यालये सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना, तसेच नोकरी-व्यवसाय किंवा अन्य महत्त्वाच्या कामासाठी प्रवास करणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाकडे हस्तक्षेपाची मागणी

रिसोड-मेहकर मार्ग सुरळीत करून एसटी सेवा तत्काळ पूर्ववत करावी, अशी मागणी वाकद येथील प्रवासी अशोक सुधाकरराव देशमुख, विजय जटाळे, अमरदीप ठाकूर, गजानन शिंदे, संतोष खरात, रुपेश ठाकूर, श्रीराम देशमुख, गजानन तिरके, धोंडू तिरके, विजय पैठणकर यांच्यासह अनेक नागरिकांनी सोमवारी केली आहे.

# यावर्डीच्या १६ विद्यार्थ्यांना विद्यार्थी शिष्यवृत्ती अंतर्गत मिळाली शैक्षणिक किट

**कारंजा तालुका प्रतिनिधी- गत दहा वर्षापासून आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था वाल्हई तर्फे कारंजा तालुक्यातील गरीब, होतकरु विद्यार्थ्यांना विद्यार्थी शिष्यवृत्ती अंतर्गत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. यामध्ये बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथील सोळा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्राप्त झाले.**

सदर शैक्षणिक साहित्य मध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गाची क्रमिक पुस्तके, रजिस्टर, स्कूल बॅग, वाटर बॅग, पेन, पेन्सिल इत्यादी वर्षभर पूरेल इतके साहित्य आहे. बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथील कु. प्रकृती विनोद मानवतकर, प्रियांशु विद्याभूषण वासे, कु.शिवानी शेषराव एकनार, कु.प्रगती गजानन ठाकरे, भावेश गणेश येवले, विष्णू गणेश इंगळे, कु.नियती संतोष घोडराव, कु. प्राची हिम्मत आडोळे, विश्वास सिद्धार्थ इंगोले, कु.श्रेया राजाराम इंगळे, यश शंकराव मांगे, दिव्या संतोष बोनके, कु.साक्षी विनायक वानखेडे, मंगेश लक्ष्मण इंगोले, कु.दिव्या संजय ठाकरे, प्रेम सुरेश उबाळे या सोळा विद्यार्थ्यांना विद्यार्थी शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती अंतर्गत संपूर्ण वर्षभर लागणाऱ्या शैक्षणिक साहित्याची किट उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थी शिष्यवृत्ती मध्ये यावर्डीच्या सोळा विद्यार्थ्यांचा समावेश केल्याबद्दल विद्यालयाचे शाळेचे मुख्याध्यापक विजय भड यांनी आदिशक्ती संस्थेच्या अध्यक्षा कविता ठाकूर, सचिव मृणाली तोमर व संचालक प्रा. निर्मलसिंह ठाकूर यांचे आभार मानले. यावेळी मुख्याध्यापक पुरुषोत्तम म्हातारमारे, मुख्याध्यापक धीरज उजवणे, मुख्याध्यापक गोळे, गजानन गावंडे, संस्थेचे संचालक देविदास काळबांडे, सुधीर धनी, कारंजा आगार व्यवस्थापक रवींद्र मोरे, हेमंत पापडे आदि मान्यवर उपस्थित होते.

# भा.प्रा.मराठी शाळेत आषाढी साजरी



रिसोड : येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत ५ जुलै रोजी शाळेच्या अध्यक्षा जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांच्या हस्ते पालखीचे व विठुरायाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेषभूषा करून व डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन उत्साहात दिंडी काढली. 'ज्ञानबातुकाराम'चा जयघोष करत मोठ्या जल्लोषात सर्व विद्यार्थी दिंडीमध्ये सहभागी झाले. छोट्या वारकऱ्यांनी वारकरी संप्रदायाचे दर्शन घडवित हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, गळयात तुळशीच्या माळा घालून हरी नामाचा गजर केला व भजन, अभंग, ओव्या व फुगड्यांचा मनमुराद आनंद लुटला. अवघी शाळाच दिंडी सोहळ्यात भक्तीरसात तल्लीन झाल्याची पाहायला मिळाली यासंगी मुख्याध्यापिका किरण दुबे यांनी महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांनी दिलेल्या सद्विचार-सद्वर्तनाच्या शिकवणुकीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. वृक्षारोपण व पसायदानाने दिंडी सोहळ्याची सांगता झाली. श. प्र.